# ज्ञान प्रबोधिनी

॥ राष्ट्रदेवाः भवेम ॥

५०

ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

## स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

## वार्षिक वृत्त

## राष्ट्रीय शके १९३३ (सन २०११-१२)

स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) या विभागाच्या वतीने किशोरी, युवती व महिला या गटांसाठी व्यक्तिविकासापासून नेतृत्व विकसनापर्यंतच्या कार्यक्रमांची योजना आखण्यात आली. राष्ट्रीय शके १९३३ (सन २०११-१२) वर्षातील कामाचे वृत्त पुढे देत आहे.

**शब्द ते शक्ती प्रकल्प** : किशोरी, युवती व महिला या गटांसाठी शब्द ते शक्ती या प्रकल्पाद्वारे भरीव कार्यक्रमाची योजना करण्यात आली होती.




किशोरी विकास तासिका

## किशोरी विकास

*** किशोरी विकास तासिका:** गेल्या वर्षी प्रमाणेच यंदाही कल्याण, कुसगाव, शिवरे, आंबवणे, विंझर, वेल्हे, पासली या ७ शाळांमध्ये ४० गावातून येणाऱ्या २५१ किशोरींसाठी विकास तासिका घेण्यात आल्या. गेल्यावर्षी ८ वीच्या किशोरींसाठी तासिका घेतल्या. यंदा ९वीत गेलेल्या त्याच वर्गासाठी वर्षभरात १२ तासिका घेतल्या. त्यात स्त्री-पुरुष समानता, अभ्यास कौशल्य, बहुदिश विचार, नि:स्वार्थी मैत्री कशी असावी? अशी विविध सत्रे, व्याख्याने व गटचर्चा या स्वरुपात झाली.त्याच बरोबर कागदी फुले,कीचेन बनविणे इ. प्रकारची ६ हस्त कौशल्ये किशोरी करायला शिकल्या.

*** तंबूतील शिबिरे:** किशोरींची तंबूतील २ शिबिरे घोरेपडळ सांगवी येथे झाली. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा विधायक व जाणीवपूर्वक विकास करण्यासाठी शिबिरात चर्चा घेण्यात आल्या. या निवासी शिबिरांना ६२ व ७४ किशोरी उपस्थित होत्या. या शिबिरात विद्याव्रतावरही चर्चा झाली. तसेच किल्ले करणे हे गटकार्य घेतले. मुलींनी छोट्या नाटिका केल्या व तोरण्याच्या धाडसी सहलीलाही गेल्या.



तोरण्यावर किशोरींची सहल

**विद्याव्रत** : शिबिरात चांगल्या सवयींची शक्ती, मन सुदृढ करावे, शरीर सतेज सुंदर करावे, खरे व्यक्तिमत्त्वविकसन, बुध्दीचा विकास यावर किशोरींनी व्याख्याने ऐकली व गटचर्चा केली. ज्या किशोरींना याचे आचरण करावे असे वाटले त्यांनी मनोगत लिहून पालकांच्या परवानगीने विद्याव्रत घ्यायचे ठरविले. ३ जानेवारीला सावित्रीबाई फुले जयंतीच्या दिवशी ७ शाळेतील ६४ जणींनी वेल्ह्याला कार्यक्रमात विद्याव्रत घेतले. कार्यक्रमासाठी त्यांचे पालक, ग्रामस्थ, शिक्षक व पुण्यातील पाहुणे असे ६०० जण कार्यक्रमाला उपस्थित होते. ६ किशोरींनी एवढ्या जनसमुदाया समोर उत्स्फूर्तपणे मनोगत व्यक्त केले.

*** ग्रंथालय योजना** : किशोरी विकास उपक्रमाला पूरक म्हणून ग्रंथालय योजना राबविली गेली. यंदा कल्याण (१५० पुस्तके), वाघदर (१००पुस्तके), सांगवी (१२५ पुस्तके) या गावातील शाळांना स्वतंत्र पुस्तके, भेट देऊन ग्रंथालय सुरु करण्यात आले.

शिवरे व पासली या गावातील शाळांच्या चांगल्या प्रतिसादामुळे साने गुरुजी कथामाले सोबत 'साने गुरुजी' या पुस्तकाचे वाटप करुन त्यावर लेखी परीक्षा घेण्यात आली, पहिल्या ३ स्पर्धकांना कथामाले तर्फे रु.१००, ७५, ५० अशी रोख बक्षिसे देण्यात आली.



वेल्ह्याला कार्यक्रमातील विद्याव्रत

*** गाव पातळीवर शिबिरे** : वांगणीवाडी, वांगणी, पाबे, लाशिरगाव, खांबवडी, खरीव, वडगाव, भागिनघर, सोंडे व कोदवडी या १० गावात ५ वी ते १० वीच्या वयोगटातील मुला-मुलींची गाव पातळीवर शिबिरे झाली. साधारण ५० मुला-मुलींची उपस्थिती होती. ही शिबिरे नवनगर विद्यालय, निगडी येथील ९वीतील अग्रणी-प्राग्रणींनी घेतली.

वेल्हे तालुक्यात किशोरींची क्रीडा कौशल्याची पूर्व चाचणी घेतली. निवडीसाठी ९ गावातून ३४ मुली आल्या होत्या. चांगली क्षमता असणाऱ्या वांगणीवाडीच्या अश्विनी वाडघरेची यात निवड झाली व निगडी येथिल क्रीडा कुलात ८वीच्या शिक्षणासाठी ती दाखल झाली.

# युवती विकास

**❋ जास्वंद वर्ग :** यावर्षी शिवापूर येथे ५ गावांतील १८ जणींनी तर कोदवडी येथे ६ गावांतील ३० जणींनी जास्वंद वर्गात प्रवेश घेतला. या दोन्ही वर्गात आरोग्याची ९ सत्रे झाली. त्यात घरगुती उपचारासाठी लागणारी माहिती दिली. वैद्य मनिषाताईंनी ही सत्रे घेतली. या वर्गात व्यक्तिमत्त्व विकसन, आरोग्य, नेतृत्वविकसन यासाठी जाणीव पूर्वक उपक्रम आखले गेले, त्या शिवाय स्वंयरोजगार कौशल्यात शिवणकाम व विणकामाचाही अंतर्भाव करण्यात आला होता. हे वर्ग ६ महिने चालले.

या वर्गाला प्रशिक्षक म्हणून यापूर्वीच्या जास्वंद वर्गातील माजी विद्यार्थिनींनी काम पाहिले. हे स्थानिक मनुष्यबळ उपलब्ध होणे ही जमेची बाजू होय!



युवतींचा कौशल्य प्रशिक्षण वर्ग

**❋ कौशल्य प्रशिक्षण वर्ग :** वेल्हा येथे १० गावातून तर घिसर येथे ६ गावातून आलेल्या युवतींसाठी कौशल्य प्रशिक्षण वर्ग झाले. या वर्गात अनुक्रमे ३० ते ३२ मुलींनी प्रवेश घेतले. या युवतींनी शिवण काम कौशल्यात स्वत:च्या मापाचे ब्लाऊज व पंजाबी ड्रेस शिकवले. बहुतेकींचे हे शिवून पूर्ण झाले. वर्ग संपताना ६ जणींनी स्वत:साठी शिवण यंत्राची खरेदी केली. २ आरोग्य सत्रांची योजना या युवतींसाठी केली होती. व्यक्तिमत्त्व विकसन सत्रांत आपले म्हणणे मांडायला शिकण्यासाठी त्यांचे विविध खेळ, नाटक सादरीकरण व स्पर्धा घेतल्या.



ब्युटी पार्लर वर्ग प्रशिक्षण

**❋ ब्युटी पार्लर वर्ग :** खोपी येथे १७ मुलींचा व सांगवी येथे १४ मुलींचा एक महिना कालावधीचा प्राथमिक पार्लर शिक्षणाचा वर्ग घेण्यात आला. या वर्गात आरोग्य सत्र घेण्यासाठी वैद्य मनिषाताई उपाध्ये आल्या होत्या.रोटरी क्लबने वर्ग घेण्यासाठी लागणारे पार्लरचे साहित्य देणगी दिल्यामुळे आता हे वर्ग गावपातळीवर घेण्याची सुविधा उपलब्ध झाली.

**❋ लेथ मशिन ऑपरेटर :** युवतींच्या तंत्रज्ञान प्रशिक्षणासाठी लेथ मशिन ऑपरेटर हा वर्ग घेतला. ह्याला ९ जणींनी प्रवेश घेतला व एकीने हा वर्ग पूर्ण केला. मशिनवर उभे राहून काम करण्याची अजून ग्रामीण युवतींची तयारी झाली नाही, हे यातून लक्षात आले.

**❋ युवती मेळावा:** वेगवेगळ्या वर्गांना येणाऱ्या युवतींचा शिवापूरला रामसीता पुराणिक तंत्र निकेतनामध्ये एकत्रित मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यास २५ गावातून ८२ युवती आल्या होत्या. कार्यवाह सुभाषराव देशपांडे, हर्षाताई किर्वे यांनी मेळाव्यास मार्गदर्शन केले. डॉ. वनिताताई पटवर्धन यांनीही खेळ घेऊन 'खेळाच्या माध्यमातून प्रश्न कसे सोडवायचे?' यावर चर्चा घेतली.

**❋ स्वंयरोजगार** :८जणींनी पुण्यात येऊन **मेंदी** काढण्याचे काम केले हया उपक्रमाची वर्षाच्या उलाढाल २०,०००/– रु. झाली. या निमित्ताने मेंदी काढणे हा उपक्रम स्वंयरोजगार निर्मिती करतो हे अनुभवातून पटले. शिवणवर्ग केलेल्या ९जणींनी विविध प्रकारच्या **पर्सेस**चे ७,५००/– रुपयांचे उत्पादन करुन स्वंयरोजगार केंद्रास विक्रीस दिले.



लेथ मशिन ऑपरेटर

**❋ मेळावा :** होम नर्सिंग वर्गातील व अन्य वर्गातील संपर्कातील युवतींचा 'रुग्णालयातील संधी' या विषयावर माहिती घेण्यासाठी मेळावा घेण्यात आला. त्याला दीनानाथ रुग्णालयातील मनुष्यबळ विभाग प्रमुख व त्यांच्या सहकारी आल्या होत्या. त्यातील ६ जणींची हॉस्पिटलच्या कामासाठी निवड केली. त्या पैकी ४ जणीं पुढील शिक्षणासाठी रुग्णालयात रुजू झाल्या.

**❋ प्रशिक्षक प्रशिक्षण सत्र :** या वर्षी विविध गावांतील साधारण १३० युवतींसाठी शिवणवर्ग घेण्यात आले. या वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षिकांचे प्रशिक्षण मानसीताई बोडस यांनी घेतले.

**❋ स्कॉलरशिप :** २ युवतींना नर्सिंग कोर्सला गावाहून पुण्यासाठी यायला लागणारा प्रवासखर्च स्कॉलरशिपच्या रुपाने दिला, तर एकीला इंजिनिअर होण्यासाठी स्कॉलरशिप देण्यात आली.

# महिला विकास

## व्यक्तिविकास

**❋ बचत गट :** ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने चालणाऱ्या बचत गटांचे दैनंदिन व्यवस्थापन जिजामाता प्रबोधन केंद्राद्वारे केले जाते. सध्या ३२ गावांत २७५ गटांमध्ये ५१०० सभासद सहभागी आहेत. मार्च २०१२ अखेर सर्व गटांची मिळून बचत रु. १ कोटी ३० लाख झाली.

एकूण रु.३ कोटी पेक्षा जास्त कर्ज वाटप झाले, त्यापैकी येणेबाकी १ कोटी ६५ लाख दिसते. या व्यवहारातून ४३ लाख रुपये महिला सभासदांना व्याज मिळाले आहे . बचत करणे व क़र्ज मिळणे या शिवायच्या अन्य सर्व कामांसाठी सुध्दा हे नियमित चालणारे बचत गट 'माध्यम' म्हणून महिला यशस्वीपणे वापरताना दिसत आहेत.



स्टॉल वरील विक्री

**✻ वार्षिक मेळावे :** गेल्या वर्षभरात १६ गावांमध्ये महिलांचे वार्षिक मेळावे झाले. ह्यात सरासरी ५० जणी प्रत्येक गावातील मेळाव्यात सहभागी झाल्या होत्या. त्यातील ४ गावात सक्रांती निमित्त तिळगूळ मेळावे झाले.मेळाव्यात महिलांच्या विविध प्रकारच्या स्पर्धा घेतल्या व बक्षीस वाटप केले.

**✻ सार्वत्रिक कार्यक्रम :** या वर्षी ४ गावात वटपौर्णिमा व ६ गावात मार्गशीर्षातील गुरुवारचे वैभवलक्ष्मीव्रत याचे सार्वत्रिक कार्यक्रम घेण्यात आले. यासाठी प्रबोधिनीच्या संस्कार विभागातील स्त्री पुरोहिता आल्या होत्या.

## स्वंयरोजगार

स्वंयरोजगार केंद्राच्या स्टॉलद्वारे या वर्षी २.२५ लाख रुपयांची विक्री करण्यात आली. तिळगुळाच्या मऊवड्यांचे ७५० किलो उत्पादन बचत गटांनी केले. दिवाळी फराळही प्रायोगिक तत्त्वावर १०० किलो उत्पादन करुन विक्री केला. विविध प्रकारच्या ५ प्रदर्शनात सहभाग घेतला. या शिवाय भीमथडी यात्रेत आपल्या सदस्यांच्या सर्व स्टॉल्सची मिळून विक्री साधारण रु. ६०,०००/- पेक्षा जास्त झाली.



'नाच ग घुमा' गणपती विसर्जन मिरणुकीत खेळ खेळणारा गट

**✻ पर्यटन सहली :** यावर्षीही गेल्या वर्षी प्रमाणेच भात लावणीच्या पावसाळी कृषि पर्यटन सहली झाल्या. त्यात २०८ जणांनी भेट दिली. शाळेच्या ग्रामीण परिचय सहलीसाठी ३ शाळा आल्या तर ज्येष्ठनागरिकांचे ३ गट कृषि पर्यटन सहलीसाठी आले. या निमित्ताने महिलांचा 'नाच ग घुमा' हा पंचमीचे पारंपारिक खेळ खेळणारा एक गट तयार करण्यात आला. त्याचे पुण्यात मंगळागौरीला ४ ठिकाणी व गणपतीपुढे २ ठिकाणी तर नवरात्रात २ ठिकाणी कार्यक्रम झाले. या निमित्ताने एक तास कार्यक्रम करणारा २० जणींचा गट तयार झाला.

**✻ सहली:** ग्रामीण महिलांच्यासाठी सहली हा आनंदचा प्रसंग असतो. या निमिताने महिला मोकळ्या होतात. या वर्षी काढलेल्या सहली पुढील प्रमाणे-

| गावे | संख्या | स्थळ | गावे | संख्या | स्थळ |
|---|---|---|---|---|---|
| ग़ाउडदरा | ५० | शेगाव, पैठण | आंबवणे | ९ | शक्तीपिठे |
| वागदरा | १३ | पंढरपूर | १० गावातील | ७०० | ▸ महालक्ष्मी कोल्हापूर |

▸ रामचन्द्र साबळे ट्रस्टच्यावतीने महालक्ष्मी कोल्हापूर येथे एकाच दिवशी जाउन आल्या.

## आरोग्य

**✻ महिला आरोग्य तपासणी :** डॉ.स्नेहल पुरंदरे यांनी या वर्षीही ग्रामीण महिलांची आरोग्य तपासणी व आरोग्य प्रबोधन केले. तपासणीच्या वेळी मेधाताई उपाध्ये यांनी हिमोग्लोबीन तपासणी केली. आवश्यकते प्रमाणे महिलांना औषधेही दिली. गुंजवणे गावातील तपासणीला पुणे जिल्ह्याच्या CEO , Dy. CEO यांनी प्रकल्पअधिकारी महिला व बालकल्याण अधिकाऱ्यांसह भेट दिली. या वर्षात खालील गावात तापसण्या झाल्या.



सहल : महालक्ष्मी दर्शन कोल्हापूर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रुळे | ७४ | पानशेत | २५ | खोपी | ६९ | निगडे | ५६ | वांगणी | ७० |
| वांगणीवाडी | २९ | कुसगाव | ७० | रहाटवडे | ६१ | गुंजवणे | २९ | | |

**एकूण ४८३ जणींची हिमोग्लोबीन तपासणी झाली.**

## नेतृत्व विकास

**✻ मासिक बैठक :-** दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी २६ गावातील प्रतिनिधींची वेल्हे कार्यालयात बैठक होते. या वर्षी या बैठकीत संपर्क कौशल्य व व्यवस्थापन कौशल्य यावर सत्रे झाली. गावपातळीवरील, तालुका पातळीवरील कारभार कसा चालतो. ह्याची या गटाने तपशीलात माहिती घेतली. पुणे केंद्रातील स्पर्धा परीक्षा केंद्राच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने अनेक

जणींनी गावाचे नकाशे तयार केले व गावाच्या विविध प्रश्नांची मांडणी केली.

❋ **प्रतिज्ञा ग्रहण** : ३ जाने. २०१२ सावित्रीबाई फुले पुण्यस्मरणाच्या निमित्ताने १२ महिलांनी प्रबोधिनीची प्रथम प्रतिज्ञा तर ३ जणींनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली. ह्या कार्यक्रमात ७ जणींनी संकल्प कथनही केले.



भारतीताई दळवी : उद्योजकता पुरस्कार स्विकारताना

❋ **विशेष:**

- **राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील** यांची भेट : 'रणरागिणीच्या देशा' या कार्यक्रमासाठी मा.राष्ट्रपती पुण्यात आल्या होत्या. या कार्यक्रमास २१ गावातील नेतृत्व करणाऱ्या १७५ जणी त्यांचे मार्गदर्शन ऐकायला आल्या होत्या. कार्यक्रमात पुण्याच्या महापौरांच्या हस्ते **भारतीताई दळवी यांना उद्योजकता पुरस्कार** देण्यात आला.
- कुसगावच्या पारंपारिक खेळ करणाऱ्या महिलांचा पारंपारिक गाण्याचा कार्यक्रम पुणे आकाशवाणीवर झाला.
- 'मुलगी बचाव' आंदोलनाच्या पदयात्रेत आपल्या जिजामाता प्रबोधन केंद्राच्या ३५ कार्यकर्त्या काही काळ सहभागी झाल्या होत्या.
- नवनिर्वाचित ५०% महिला राखीव सदस्यांचा सत्कार समारंभ पुण्यात प्रबोधिनीच्या वतीने करण्यात आला. त्याला महानगरपालिका व जिल्हा परिषद सदस्य अशा २३ जणी आल्या होत्या. कार्यक्रमाच्या नियोजनापासून उपस्थिती पर्यत ग्रामीण महिलांचा सहभाग ५०% होता.

## विविध प्रकल्प



मुलगी बचाव अदोलन: खासदार सुप्रियाताई सुळेंसह जि.प्र.केंद्र सदस्य

❋ **आंबवणे प्रशिक्षण केंद्र –** गेली ३ वर्ष चालू असणारा आंबवणे प्रशिक्षण केंद्र हा प्रकल्प ऑक्टोबर ११ ला संपला. या अंतर्गत आपण गरोदर महिलांची मासिक तपासणी हा उपक्रम पाटणकर नर्सिंग होमच्या सहकार्याने सातत्याने घेतला. प्रकल्प समाप्ती नंतरही हा उपक्र म आता नियमित कामाचा भाग म्हणून सुरु आहे. या वर्षीची तपासणी :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एप्रिल | ३२ | मे | ३२ | जून | ४८ |
| जुलै | ४२ | ऑगस्ट | ३९ | सप्टेंबर | ५२ |
| ऑक्टोबर | ६२ | नोव्हेंबर | ४७ | डिसेंबर | ५५ |
| जानेवारी | ६४ | फेब्रुवारी | ६६ | मार्च | ५८ |

प्रकल्पा–अंतर्गत एकूण ३ वर्षात ३५ वेळा तपासणी झाली. ११५ गावांतून आलेल्या६८३ जणींनी याचा लाभ घेतला. पाटणक र हॉस्पिटल मध्ये या कालावधीत ५४ बाळंतपणाची ऑपरेशन्स झाली. हे केंद्र होते म्हणून २० पेक्षा जास्त जणींनी आपत्य प्राप्तीसाठीचे उपचार अत्यल्प दरात करुन घेतले व त्यांना अपत्य प्राप्ती झाली. ह्या तपासणी केंद्रामुळे घरच्याऐवजी दवाखान्यात बाळंतपण करण्याचे प्रमाण ३०% ने तरी वाढले, असे निश्चितच म्हणता येईल.

यंदा या तपासणी सोबत ३ वेळा बालरोगतज्ज्ञांची भेट ठरवून लहान मुलांच्या तपासणीची व्यवस्था केली होती. एकूण १०२ मुलांची तपासणी झाली.

आंबवणे प्रशिक्षण केंद्रामुळे आंबवणे हे प्रबोधिनीचे एक 'उपक्रम कें' बनले व बोरावळे , कोंढवली, वांगणी, जांभळी, वडगाव, कोदवडी येथे याद्वारे नव्याने काम सुरु झाले.



यशोदा प्रकल्प: हिमोग्राम तपासणी

❋ **यशोदा प्रकल्प:** वेल्ह्यातील भावी पिढी सुदृढ करण्यासाठी यशोदा आरोग्य प्रकल्प डिसेंबर ११ पासून सुरु झाला. या प्रकल्पात युवतींची महिमोग्राम तपासणी करुन काही कुपोषणाचे घटक आढळल्यास वेळेवर उपचारांना सुरवात करावी या हेतूने डिसेंबर ते मार्च या कालावधीत १२ गावातील ५१९ जणींचे हिमोग्राम जनकल्याण रक्तपेढीच्या मदतीने तपासण्यात आले. १० पेक्षा कमी हिमाग्लोबिन असणाऱ्या ६४ जणी या तपासणीत आढळल्या. त्यांना औषधोपचार सुरू करण्यासाठी त्यांची नावे 'आशा' कार्यकर्तीला दिली.

ज्या गावात एस.टी ची व्यवस्था नाही अशा दुर्गम गावातून वाहन व्यवस्था करुन आंबवणे येथील आरोग्य तपासणीला गरोदर महिलांनी यावे यासाठी आपण प्रयत्न करत

आहोत. यशोदा प्रकल्पातील दुर्गम गावातून आलेल्या महिलांची फेब्रुवारीत ८ तर मार्चमध्ये१० संख्या होती.



वेल्हे तालुक्यातील अंगणवाडी कार्यकर्त्यांचे शैक्षणिक गुणवत्ता विकासे प्रशिक्षण

**✱ 'वेल्हे तालुका कुपोषणमुक्त करणे'** : या वर्षीही आपण 'वेल्हे तालुका कुपोषणमुक्त करणे' या कार्यक्रमात सहभाग घेतला. आंबवणे येथे ०-५ वयोगटातील ६१६ मुलांचे लसीकरण करण्यात आले. ही बालके १७ गावांतून एकत्र आली होती. हे लसीकरण कल्याणी ट्रस्टच्यावतीने मोफत करण्यात आले. बालक-पालकांना आंबवण्याला आणायची व्यवस्था रोटरी क्लबने केली होती तर L &T Infotech चे २५ जण स्वयंसेवक म्हणून काम करण्यास आले होते. सलग ३ महिने दर महिन्यातील एका रविवारी हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे संयोजन आपण केले होते.

**✱ कार्यशाळा 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना'** : वेल्हे तालुक्यातील सर्वच्या सर्व म्हणजे १७ शाळांमध्ये ८ वी ते १० वी च्या वर्गावर २१८५ विद्यार्थ्यांसाठी 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना' ही कार्यशाळा प्रबोधिनीच्यावतीने घेण्यात आली. त्यासाठी मार्गदर्शन करायला पुण्यातून 'संवादिनी' संघटनेच्या सदस्या आल्या होत्या.

**✱ अंकुर प्रकल्प** : वेल्हे तालुक्यातील ११२ अंगणवाडी कार्यकर्त्यांचे शैक्षणिक गुणवत्ता विकास संदर्भात वर्षभरात १२ दिवसांचे प्रशिक्षण घेतले . या मध्ये प्रज्ञा मानस संशोधिका व सोलापूरच्या शिशु अध्यापिका विद्यालय येथील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. मुलांना शिकवायचे खेळ, गाणी, गोष्टी, पंचेन्द्रिय विकास, साधन निर्मिती स्थानिक सहित्यातून कशी करायची ? यावर सत्रे झाली व प्रत्यक्ष साधन निर्मितीही झाली.



प्रतिज्ञा ग्रहण

**✱ अनुभव कथन** : या वर्षीही सोस्वा प्रशिक्षण केंद्र , यशदा, रिझर्व बँकेचे कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बँकिंग या ठिकाणी बचतगटाच्या कामाच्या अनुभवाचे कथन करण्यासाठी व मार्गदर्शन सत्र घेण्यासाठी आपल्या कार्यकर्त्या १० वेळा गेल्या होत्या .

**✱ १० वी मार्गदर्शन वर्ग** : वेल्हे तालुक्यातील ५४ जणी मुक्त विद्या केन्द्राच्या परीक्षेस बसल्या होत्या. त्यांच्यासाठी मार्गदर्शन प्रशिक्षण सत्रे करंजावणे येथे घेण्यात आली. या सत्रास सुनीला गोंधळेकर व कल्पना कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

**✱ इनर व्हील क्लब : इनर व्हील क्लब ऑफ रिव्हर साईड** यांच्या वतीने निधान - सांगवी या गावात पुढील प्रमाणे विकास कार्यक्रम घेण्यात आले. प्राथमिक शाळेत ग्रंथालयासाठी पुस्तके देण्यात आली व पाण्यासाठी फिल्टर देण्यात आला .बचत गटातील ५ महिलांना ५ फिल्टर देण्यात आल.गटातून उद्योजकता वाढीस लागावी म्हणून महिला उद्योजकांना पिठाची गिरणी व गावातच भाजीची टपरी या व्यवसायासाठी खेळते भांडवल देण्यात आले. आरोग्य जागरुकतेसाठी ७० जणींचे हिमोग्लोबिन तपासले गेले व डॉ.स्नेहलताई पुरंदरे यांनी चाळीशीतील आरोग्याबद्दल माहिती सांगून औषधे दिली. याच गावात चारसूत्री भात लागवडीतील महिलांसाठी कार्यशाळा घेण्यात आली.



महिलांसाठी कार्यशाळा

**✱ इनर व्हील क्लब (कॉप्स):** रायदंडवाडी येथे अजूनही शासकीय वीज पोहोचलेली नाही. येथे प्रकाशासाठी एल.ई.डी. दिवे व ते चार्ज करण्यासाठी सायकल (चक्र) याची देणगी इनरव्हील क्लबने दिली.

**✱ रोटरी क्लब** : रोटरी क्लब ऑफ मिड टाउनच्या वतीने ब्यूटी पार्लरचा वर्ग घेण्यासाठीची भांडवली गुंतवणूक वस्तूरूप देणगीच्या रुपात दिली, तर त्यात बरोबर फोटो प्रिंटर व रबरी स्टँप बनवण्याचे मशिनही महिलांच्या उद्योजकतेला मदत म्हणून दिले.

**रोटरी क्लब ऑफ मिड इस्टच्या** वतीने महिलांना शिवण वर्गासाठी ३ शिवण यंत्रे भेट देण्यात आली.

*****

---

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि ८० (जी) खाली करमुक्त आहेत**

**ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण),** ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०. दूरभाष क्र. २४२०७१६२, २४२०७०००

mail id : suvarna.gokhale@jnanaprabodhini.org